# आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेतील प्रतिमासृष्टी

**डॉ. राष्ट्रपाल मेश्राम,**
मराठी विभाग प्रमुख,
समाजकार्य महाविद्यालय, कामठी
९८६००४९६३८
rashtrapalmeshram1979@gmail.com

प्रस्तावना

मराठी साहित्यात अत्यंत विद्रोही समजले जाणारे साहित्य म्हणजे दलित-आंबेडकरी साहित्य होय . दलित-आंबेडकरी साहित्यकारांनी आपले विचार आणि अनुभवांच्या परिणामकारक अभिव्यक्तीसाठी कविता हा साहित्यप्रकार स्वीकारला आणि उत्स्फूर्तपणे काव्यनिर्मिती केली .आज ही कविता मराठी साहित्याच्या इतिहासातील एक अपूर्व असा टप्पा आहे. ही कविता वास्तव जीवनानुभवातून उदयाला आल्याने या कवितेने मराठी रसिक वाचकांना नव्या भावविश्वाची, नव्या अनुभवविश्वाची, नव्या जीवनदर्शनाची ओळख करून दिली. वेगळी आशयघनता आणि अभिव्यक्तीचे निराळे रूप यांमुळे ही कविता साहित्याच्या आसमंतात चमकून उठली. अन्यायाविरुद्धची चीड आणि प्रस्थापित व्यवस्थांना, संकेतांना ,संस्कृतींना दिलेला संपूर्ण नकार या कवितेत सर्वत्र व्यक्त झाला आहे. म्हणूनच ही कविता रौद्रभीषण वाटते. हे रौद्रभीषण स्वरूप दलित-आंबेडकरी कवितेचे सार्वत्रिक रूप म्हणता येईल .दलित-आंबेडकरी कवींबरोबर कवयित्रींनीसुद्धा तितक्याच समर्थपणे या कवितेचा प्रवाह समृद्ध केला करून त्याला सागरसरितेत रूपांतरित करण्याचे कार्य केले आहे. हिरा बनसोडे, मलिका अमर शेख, ज्योती लांजेवार,कुमुद पावडे, प्रज्ञा लोखंडे, मीना गजभिये, संध्या रंगारी, प्रतिभा राजानंद, सुरेखा भगत, उषाकिरण आत्राम, सरला ठमके, कुसुम अलाम,उषा अंभोरे,उषा हिंगोणेकर,निशा शेंडे ,माया वासनिक ,नेहा गोडघाटे अशा कितीतरी कवयित्रींनी आशयाभिव्यक्तीच्या दृष्टीने नवी कविता वाचकांसमोर ठेवली. अनोख्या प्रतिमा, प्रतीके आणि संकेतांनी भरलेल्या त्यांच्या कवितेने वाचकांना अनोख्या जीवनविश्वाची ओळख करून दिली. त्यांच्या कवितेतून व्यक्त होणाऱ्या आशयाला विविध परिमाणे लाभलेली आहेत .या कवितेने परप्रकाशाचा आधार घेऊन आपली वाट घडविली नाही ,तर परप्रकाशित परंपरा नाकारत आंबेडकरी तत्त्वविचारांच्या नवप्रकाशात या कवितेने स्वतःला सिद्ध केले .खऱ्या अर्थाने ती नवकविता आहे. पारंपरिक संकल्पना, आणि दृष्टिकोनांचा बिमोड करून नव्या प्रतिमा ,प्रतीके आणि,संकेतांनी भरलेली ही आशयगर्भ कविता नव्या जाणिवेची कविता आहे.

**प्रतिमाविचार :-**

प्रतिभावंताला जेव्हा मोजक्या आणि विवक्षित शब्दांत त्याच्या मनातील आशयाचे प्रकटीकरण करायचे असते तेव्हा तो कवितेत अनेक प्रतिमा उभ्या करीत असतो' .प्रतिमा म्हणजे शब्दांनी रेखाटलेले चित्र' असा प्रतिमेचा सार्वत्रिक अर्थ आहे.हा अर्थ मूलभूत आहे .प्रतिमा ही संकल्पना वर म्हटल्याप्रमाणे इतकीही सहज सरळ नाही .प्रतिमेला विविध आयाम आहेत .काव्यातील प्रतिमा अनेक अर्थांनी युक्त असतात .कवितेत अर्थाचा

विस्तार करण्यासाठी प्रतिमेचे उपयोजन होत असते. कवितेतील या प्रतिमांतून कवीच्या भावतरंगांचे आकलन रसिक ,विचारविवेकी वाचकाला यथार्थपणे होते .व्यापक आशय कमी शब्दांत सांगण्यासाठी प्रतिभावंत कविता या साहित्यप्रकाराची निवड जाणीवपूर्वक करतो .काव्यात आशयाच्या विस्तारीकरणासाठी कवीला आशयगर्भीत प्रतिमा योजाव्या लागतात.त्यामुळे प्रतिमा ही काव्याचा अनिवार्य घटक बनली आहे .म्हणूनच प्रतिमेला काव्याचा गाभा मानले जाते. कवितेत एकाच वेळी ,एकाच पातळीवर अनेक अनुभूती प्रतिबिंबित करण्यासाठी प्रतिमेचा आधार घ्यावा लागतो. वसंत आबाजी डहाके यांनी “प्रतिमा म्हणजे एखादा या पदार्थाचे दृश्य प्रकटीकरण”[१] अशी प्रतिमेची व्याख्या केली आहे. शब्दांच्या इंद्रियगोचर रचनांमधून प्रतिमा साकारल्या जातात . कवीच्या अनुभूतींची शब्दचित्रे कवितेत प्रतिमेचे रूप धारण करतात. या प्रतिमारूपी शब्दांमधून अर्थपूर्ण आशयाचे प्रकटीकरण होते . कवितेत येणारे सर्वच शब्द प्रतिमा नसतात, तर काही ठराविक शब्दच प्रतिमा असतात .प्रतिमेच्या मागेपुढे योजिले गेलेले काही शब्द प्रतिमेचा अर्थ पूर्ण करण्यासाठी उपकारक ठरतात. प्रतिमेतील आशय समृद्धीकरणासाठी कवितेतील शब्द फार सहाय्यभूत ठरतात .बहुतांशदा हे शब्दसुद्धा अंशप्रतिमाच असतात .प्रख्यात समीक्षक सुधीर रसाळ यांनी कवितेला ‘प्रतिमांची सेंद्रिय रचना’ संबोधून कवितेतील प्रतिमेची अपरिहार्यता निश्चित केली आहे .प्रतिमेची व्याख्या करताना ते म्हणतात“ ,प्रतिमा म्हणजे उपचारांनी चिन्हांकित होणाऱ्या दोन किंवा अधिक मानसिक संदर्भांमध्ये म्हणजेच त्यातील सहसंवेदनाकृती व संलग्न भावनिक वैचारिक घटक यांमध्ये घडणाऱ्या साधर्म्यवैधर्म्यधिष्ठित आंतरप्रक्रियेतून निर्माण होणारी गतिशील अनेकार्थी व सेंद्रिय घटना होय”.[२] कविता ही शब्दांची लयबद्ध अशी रचना असते. कवितेतील शब्दांच्या अर्थामधून प्रतिमा निर्माण होतात. कवीला आपल्या भावना, जाणिवा, अनुभव, विचार, कल्पना, अर्थ या सगळ्या घटकांचे संसूचन करण्यासाठी प्रतिमेच्या भाषेचा आधार घ्यावा लागतो. विवक्षित आशय विशिष्ट शब्दांत व्यक्त करून त्याला अर्थसमृद्ध करण्यासाठी प्रतिमा अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात. प्रतिमांतून कवितेचा आशय खऱ्या अर्थाने विस्तारत जातो. कवितेतील संदर्भ उलगडत जातात. प्रतिमेच्या आकलनातून वाचक कवीच्या अनुभवविश्वाशी तादात्म्य पावतो. डॉ .महेंद्र भवरे यांनी केलेली व्याख्या महत्त्वपूर्ण आहे .त्यांनी “अनुभवांचे उच्चारचिन्हांनी अधोरेखित होणारे संगत आणि असंगत भावना वा विचारांचे,अर्थसघन आणि मानसगोचर प्रत्ययांचे संयुक्तीकरण करणारे संघटन म्हणजे प्रतिमा ”[३] अशी प्रतिमेची व्याख्या केली आहे .कवीला काव्यातून आशयाचे जे चित्र वाचकांच्या मन:चक्षूपुढे उभे करायचे आहे ,त्यानुसार कवी शब्दांचे संघटन निर्माण करून प्रतिमांची योजना करतो. एखादा कलावंत काव्यातून आपला अनुभव विवक्षित शब्दांत मांडत असतो; परंतु त्या शब्दांतील प्रतिमांतून रसिक मात्र त्यातील विविध पातळ्यांवरील अनुभूतीचे ग्रहण करीत असतो. संथ पाण्यावर एखादा खडा मारावा आणि पाण्यावर अनेक तरंग निर्माण व्हावे, त्याप्रमाणे कवितेतील प्रतिमांतून कवितेतील दडलेल्या अर्थाचे अनेक पदर वाचकाच्या वाचकांच्या दृष्टीस पडतात .प्रतिमा कवीच्या अनुभूतीचे सर्वसमावेशक दर्शन घडविण्यासाठी कार्यरत असतात; एवढेच नव्हे तर कवितेला सौंदर्य प्राप्त करून देण्याचे कार्यही प्रतिमेद्वारे साधले जाते .

**आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेतील प्रतिमासृष्टी :-**

आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेतील प्रतिमासृष्टी विलक्षण वैशिष्ट्यपूर्ण आहे. ही कविता सामाजिक भान जपणारी आहे. आत्मभान, अस्मिता, नकार, विद्रोह, निषेध, वेदना, बांधिलकी या जाणिवांच्या विविध

पातळ्यांवरील आशय समृद्ध करणाऱ्या प्रतिमांनी या कवितेला स्वतंत्र ओळख प्राप्त करून दिलेली आहे. वाचकाला भयचकित करणाऱ्या अनेक प्रतिमा आंबेडकरी कवयित्रींच्या कवितेत आलेल्या आहेत. या प्रतिमांतून दलित जीवनाचे भयावह दर्शन घडते, तसेच स्त्रीदु:खाच्या अंतहीन वेदनांचेही भीषणभयानक दर्शन घडते. पारंपरिक कवितेतील गुळगुळीत प्रतिमा या कवितेत अभावानेच आढळतात. किंबहुना पारंपरिक काव्यातील प्रतिमा रौद्रभीषण रूप धारण करून या कवितेतून प्रकट झाल्या आहेत. कवयित्रींचे संवेदनशील मन, त्यांच्या भावना, विचारसंवेदना, आणि जाणिवा विविध प्रतिमांतून उत्कटपणे प्रकट झाल्या आहेत. या प्रतिमासृष्टीतून ऐतिहासिक ,सामाजिक,सांस्कृतिक, वाङ् मयीन अनुभूतीचे परस्परविरोधी चित्र आकाराला आले आहे.

**आंबेडकरवादी कवयित्रींच्या जाणिवा आणि प्रतिमासृष्टी :-**

जाणिवांची तीव्रता वाचकांच्या मनावर प्रभावीपणे प्रतिबिंबित करण्यासाठी प्रतिमेचे रूप निश्चित होत असते .जाणिवेमुळे सामाजिक अंतर्विरोध ,शोषणव्यवस्था ,जातिव्यवस्था ,वर्णाश्रमव्यवस्था ,श्रृतिस्मुतिपुराणोक्त संस्कृती इत्यादीविषयीच्या प्रतिमा निर्माण होतात. आत्मभानाने आलेली जाणीव वाचकांच्या मन:पटलावर तीव्रतेने रुजविण्यासाठी विविध स्वरूपाच्या प्रतिमांचे उपयोजन होत असते. सामाजिक वास्तवाच्या आकलनातून ही जाणीव वाचकांसमोर प्रभाव निर्माण करते .या जाणिवेतून विचारचिंतन प्रस्फुरित होते. या जाणिवेची समूहजीवनाशी बांधिलकी असते.दलित-आंबेडकरवादी कवयित्रींच्या जाणिवा बहिष्कृत जीवनाच्या निदर्शक आहेत .पारंपरिक कवयित्रींच्या जाणिवा आणि दलित कवयित्रींच्या जाणिवा यांत अमीट अंतर आहे . आंबेडकरवादी कवयित्रींनी उरातील वेदनांचा उरूस जेव्हा कागदावर मांडला ,तेव्हा अशा जाणिवांनी रूढ चौकटीपलीकडची शब्दरूपे धारण केली .जाणिवेच्या या विलक्षण वेगळ्या प्रतिमांमुळे या कवितेला वेगळे परिमाण लाभले .ही कविता व्यक्तिनिष्ठ न राहता समूहमनाशी जोडली गेली. कवयित्रींनी आपल्या जाणिवा प्रकट करताना भोवतीच्या सामाजिक वास्तवाचे आकलन करून, या सामाजिक वास्तवामागची अचूक मीमांसा केली. त्यांनी अनीती,अन्याय,अत्याचार,अरेरावी यांचा विरोध आणि धिक्कार करून नव्या समाजधारणेचे उद्दिष्ट नजरेपुढे ठवले .या कवयित्रींच्या कवितेतील प्रतिमांच्या जडणघडणीत 'जाणीव' हा घटक केंद्रस्थानी आहे. ही जाणीव समूहजीवनाशी बांधील असल्यामुळे ती अधिक परिणामकारकपणे आविष्कृत झाली आहे .सभोवतालच्या सामाजिक-सांस्कृतिक परिवेशातील समाजवास्तवाचे निरीक्षण मांडताना या जाणिवेने विविध प्रतिमांचा आधार घेतला .

या जाणिवा साकार करताना कवयित्रींनी दारिद्र्याच्या आशयाबरोबर आत्मसन्मान प्रकट करणाऱ्या प्रतिमा साकारल्या आहेत" .आजवर स्पर्श होता/ तो जळत्या सूर्याचाच /आगच आग महाभयंकर/ पाठ कसची शेकते/ ती तर पार कोळेगली/ शिळ्या भाकरीचेही कोळसेच कोळसे / आता पेटली शेकोटी/ फेर धरा नि नाचा/ सूर्य समोरा प्रकाश प्रकाश"[४] सुगंधा शेंडे यांच्या या ओळींतील' जळता सूर्य' ,'महाभयंकर आग', 'कोळेगली पाठ' ,'भाकरीचे कोळसे 'या प्रतिमांतून अन्यायाच्या ,शोषणाच्या छळांनी भरलेल्या दलित जीवनाची जाणीव प्रकट झाली आहे .दलितांच्या दाहक वेदनामय जीवनाचे दर्शन या प्रतिमांतून घडते .तर 'आता पेटली शेकोटी ,' 'फेर धरा नि नाचा' ,'सूर्य समोरा प्रकाश प्रकाश 'या प्रतिमांतून गुलामीविरुद्धच्या बंडाला उद्युक्त करणारी जाणीव प्रकट झाली आहे" .या वेशीलगतच्या झोपड्यातला काळोख/ मला जाळतोय/ भुकेने व्याकूळलेल्या डोळ्यांतले

पाणी/ मला शोषून घेतेय/ त्यांच्या कोरड्या शुष्क ओठांवरचे गाणे"[५]) ज्योती लांजेवार" .(हाती हातकड्या,पायात बेड्या/ निर्जीव कवट्या/ रक्तातले हिमोग्लोबिन/ काढून टाकलेले"[६] किंवा" तप्त वाळवंटात आक्रोश करतंय/ अस्पृश्यतेचे नागडे पोर/ कुणाही नाथाला ते ऐकू येत नाही /कुडाच्या मोडक्या झोपडीत/ उपासाने गरिबी विव्हळत आहे /कुणीही कर्ण अन्नदान करीत नाही"[७])हिरा बनसोडे" .(गावकुस खुळखुळयाची काठी /यस्करकीची पाटी / चान्या डल्ल्या गुडसा/ ढोलकं कांडं संबळ / सरवा मोळ्या /विळी  कोयता/अखखा लसलसता भूतकाळ मातीतला"[८]( प्रज्ञा लोखंडे)

वरील सर्व प्रतिमा अत्यंत बोलक्या व इंद्रियगोचर आहेत .वर्णव्यवस्थेचा, जातिव्यवस्थेचा बळी झालेल्या दलित वर्गाला अन्न,वस्त्र, निवारा मिळत नाही .भुकेने तडफडणारे हे गावकुसाबाहेरील दलित जग अमानुषतेच्या दाहक वणव्यात जळत आहे .त्यांचे दु:ख पाहून कुणाही माणसाला गहिवर येत नाही. उलट ही पाषाणहृदयी संस्कृती दलितांवर वेठबिगारीचे जिणे लादते .हा दाहक वेदनामय अनुभव वरील प्रति मांतून प्रतीत झाला आहे .अन्याय ,शोषणाच्या घटनांनी भरलेले भूतकाळाचे चित्रण करणाऱ्या जाणिवेच्या प्रतिमा अन्यवर्गीय कवयित्रींच्या अनुभवापेक्षा कितीतरी पटीने वेगळ्या आहेत .दलित कवितेतील ही जाणीव प्रतिमा सांस्कृतिक परिवर्तनासाठी आहे .या प्रतिमांतून माणसाची प्रतिष्ठा स्थापन करायची आहे .ह्या प्रतिमा दु:खाची जाणिवाच मांडीत नाहीत तर समतावादी समाजाच्या संकल्पनेलाही आकार देण्याचा प्रयत्न करतात .या जाणीव प्रतिमांतून दलित जीवनाचे भेदक दर्शन घडते .या जाणीवदर्शक प्रतिमा सामाजिक सांस्कृतिक परिवेशाच्या ताणातून निर्माण झाल्या आहेत .जाणिवेमुळे सामाजिक अंतरविरोधाच्या, शोषणाच्या अन्याय-अत्याचाराच्या प्रतिमा निर्माण झाल्या आहेत. समूहवेदनेला प्रतिमेत परावर्तित करण्याचे कार्यही जाणिवेमुळे घडून आलेले दिसते .जाणीव हा घटक काव्यात कशा प्रकारे प्रतिमा उभी करतो ते खालील उदाहरणावरून आपल्याला समजून घेता येईल. हिरा बनसोडे यांची कवितेत  सामाजिक दाहक वास्तवाचाचे रूप अनुभवायला मिळते" .सनातनी कर्मठ श्वासातून/ चिरेबंदी रूढीच्या रचनेतून/डंख झालाय जातीचा/ डंक झालाय धर्माच्या /चातुर्वर्ण्याच्या जहरी नागांचा /जालीम भयानक विळखा/ जहरीला जीवघेणा दंश/ पसरलाय लागण झालेल्या प्लेगसारखा"[९]' सनातनी कर्मठ श्वास ,' 'चिरेबंदी रूढी' ,'चातुर्वर्ण्याच्या जहरी नागांचा' ,'जालीम भयानक विळखा' या प्रतिमांतून शोषणाचे सामाजिक संदर्भ मांडण्यात आले आहे. या प्रतिमा प्रस्थापित व्यवस्थेच्या निदर्शक आहेत. मानवाला हीन करणाऱ्या संस्कृतीच्या  द्योतक आहेत. ही अभेद्य प्राचीन व्यवस्था आहे. कारण ती चिरेबंदी आहे. या व्यवस्थेने संपूर्ण समाजाला जातिवर्गाला मरणांतिक जखडून ठेवले आहे. त्यातून मानवाची सुटका नाही. वर्णव्यवस्थेने प्रत्येकाच्या पायात गुलामीच्या बेड्या करकचून ठोकल्या आहेत. सांस्कृतिक जीवनातील हे भीषणभयानक वास्तव आहे . 'जहरीला जीवघेणा दंश 'या प्रतिमेतून जातिव्यवस्थेतून माणसाची सुटका नाही; तो मुक्तीसाठी धडपडला तर जीवघेणा दंश त्याला संपवून टाकेल, हे वास्तव तीव्रतेने वाचकांच्या मनावर रुजविण्यासाठी वरील सर्व प्रतिमांचे उपयोजन झाले आहे. हे समाजनिष्ठ वास्तव जाणिवेच्या प्रभावामुळे प्रतिमित झाली आहे .यातून दलितांवर होणाऱ्या सनातन्यांच्या अत्याचारांचे सांस्कृतिक वास्तव स्पष्ट झाले आहे. या वास्तवाचे आकलन आणि अत्याचाराची तीव्रता 'जहरीला जीव घेणारा दंश ' या प्रतिमेतून ठळकपणे प्रत्ययाला येतो.

**बहिष्कृत जीवन आणि प्रतिमा :-**

बहिष्कृत जीवनाचे अनुभव मांडताना अनेक प्रतिमा कवयित्रींनी आपल्या कवितेतून उभ्या केल्या आहेत. या प्रतिमांतून गावकुसाबाहेरचे बहिष्कृत जग चित्रित झालेले आहे" .ना रोजगार, ना धंदा/ ना विद्या,ना ज्ञान/ रांग एक /शूद्र युवा आणि श्वान"[१०] शूद्र आणि स्वान या अंतर्विरोधी प्रतिमेतून सुगंधा शेंडे यांनी गावकुसाबाहेरचे बहिष्कृत जीवन किती हीन असते हे दाखवून दिले .वर्णव्यवस्थेने निर्माण केलेल्या जातीच्या चौकटीमुळे सर्वात खालच्या वर्गातील तरुणांची गत कुत्र्याप्रमाणे झाली आहे. उकिरड्यावर राहणारा, दिलेल्या तुकड्यावर जगणारा, कुणाकडूनही लाथ आणला जाणारा, सतत शिवीगाळ खाणारा, कोणीही पाठीत धोंडा आणि काठी हाणावा, असे कुत्रे झालेले दलित जीवन या प्रतिमेतून दर्शित होते. लाचारी, बेरोजगारी, अज्ञान या शब्दांच्या संघटनांनी 'शूद्र युवा आणि श्वान' या प्रतिमेला वापर व्यापक अर्थरूप दिले आहे' .कमरेला झाडू' ,'गळयात मातीचा गडू ,' 'उचला ते मेलेलं ढोर' 'करा मौज सडक्या मांसावर' या प्रतिमांतून पेशवाईतील गावकुसाबाहेरील भीषण दलित जीवनाचे चित्र उभे केले आहे. वेशीबाहेरच्या माणसाचे जग कसे होते, याचे हे इंद्रियगोचर चित्र आहे. दलितांचे दलितत्व उलथून पाडण्यासाठी हे दुःख दलितांत विद्रोह पेटविणारे, त्यांच्यात क्रांतीची बीजे रोवणारे आहे. हा आशावादही 'पोषक नायट्रोजन' ,'चढेल मांडवी वेल' या परस्परविरोधी प्रतिमांतून साकार झाला आहे. प्रतिमा जशा समानशील अर्थाचे सूचन करतात, तशाच परस्परविरोधी अर्थाचेही सूचन करतात .गावकुसाबाहेरील जग रेखाटताना ज्योती लांजेवार म्हणतात" ,या देशाची तू मूळ संस्कृती/ तरी गावकुसाबाहेर तुझी वस्ती/ घाम गाळून पिकविल्या सोन्याच्या राशी/ तरीही ह्या मातीने तुला ठेवले उपाशी/ तू कधीही दिसली नाहीस नव्याकोऱ्या जरीकाठीइरकली लुगड्यात"[११] ज्योती लांजेवार यांनी बहिष्कृतांच्या जीवनातील भुकेचे चित्रण अंगावर शहारे आणणारे आहे" .या वेशीलगतच्या झोपड्यातला काळोख मला जाळतोय/ भुकेने व्याकूळ झालेल्या डोळ्यातले पाणी/ मला शोषून घेतेय / त्यांच्या कोरड्याशुष्क ओठारचे गाणे". [१२] प्रस्थापितांनी जातिव्यवस्थेच्या भिंती उभारून जिवंत माणसांवर बहिष्कृततेचे जिणे लादले .हे जीवन पशूपेक्षाही किती हीनदीन होते ,याचे प्रत्यंतर वाचकाला या कवितेतील विविध प्रतिमांतून अत्यंत प्रखरपणे येते .

**स्त्रीदुःखाच्या प्रतिमा :-**

भारतातील दलितांवरील अत्याचारात इतकाच स्त्रीजातीवरील अत्याचाराचा इतिहासही पुरातन आहे. मग ही स्त्री कोणत्याही वर्गातील असो. इथल्या सनातनी हिंदू मानसिकतेने स्त्रीला गुलाम करून ठेवले होते. धर्मव्यवस्थेने स्त्रीभोवती रूढी-परंपरांची असंख्य बंधने उभी करून त्यात तिचे स्वातंत्र्य कैद करून टाकले होते. व्यवस्थेने स्त्रीला भ्रष्ट ,अविवेकी, पापी, व्यभिचारी, अपवित्र ,कुलटा जहाराची पुडी संबोधून विषमतेचा कळस गाठला होता. फुले-आंबेडकरांनी उभारलेल्या चळवळीतून स्त्री खडबडून जागी झाली. स्त्रीमुक्तीचे आंदोलन उभे झाले. महात्मा फुले यांनी उभारलेल्या स्त्रीमुक्ती चळवळीला आंबेडकरांनी घटनात्मक अधिकार प्राप्त करून दिला. स्त्रियांनी बाईपणाची कात टाकून स्त्रीला गुलाम करणाऱ्या रूढी-परंपरांवर, पुरुषवर्चस्वी व्यवस्थेवर आवाज उठविला. आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितांतूनही स्त्री आत्मभानाचा, स्त्री-स्वातंत्र्याचा, स्त्री-अस्तित्वाचा, स्त्री-अस्मितेचा वडवानल उद्रेकित झाला. त्यांची कविता धर्मशास्त्रे, धर्मक्षेत्रे ,श्रुती-स्मृती-पुराणे,जाती-वर्णव्यवस्था या सामाजिक पर्यावरण मलीन करणाऱ्या दूषितांवर विजेसारखी सर्व शक्तीनिशी तुटून पडली .या कवयित्रींनी सामाजिक जीवनाबरोबरच स्त्रियांच्या वेदना- संवेदना, मानसिक इच्छा-आकांक्षा, प्रेम-मैत्री इत्यादी भावना

कवितेतून प्रकट केल्या. या भावनांच्या अभिव्यक्तीसाठी प्रतिमांची निर्मिती त्यांनी केली. हिरा बनसोडे, मलिका अमर शेख, ज्योती लांजेवार, प्रज्ञा लोखंडे यांनी स्त्रियांच्या वाट्याला आलेले दुःख आपल्या कवितेतून अत्यंत प्रभावीपणे शब्दबद्ध केले आहे. हिरा बनसोडे म्हणतात" ,पाण्यावर आली साय / फेनफुले उमलली/ पौर्णिमेची रात सारी /लोचनांनी प्राशियेली".[१३]' पाण्यावरील साय' ,'फेनफुले उमलली 'या प्रतिमा कवयित्रीच्या वाट्याला आलेल्या प्रेमवैफाल्याच्या अनिवार दुःखाची जाणीव करून देते" .सिद्धार्थाने सिद्धी साधली/ अन् जगताचे अश्रू पुसले/ यशोधरेच्या नयनकडातील/ नाही अजुनी अश्रू खळले"[१४] ' यशोदेचे अश्रू 'या कवितेतील या ओळी आहेत .ही कविता थोडीफार कथेच्या स्वरूपात आली आहे. जगाचे दुःख पाहून सिद्धार्थला वैराग्य उत्पन्न झाले . सिद्धार्थाने पत्नी यशोधरा आणि पुत्र राहुल यांचा त्याग केला. जगाचे अश्रू त्यांनी पुसले. परंतु यशोदेचे अश्रू अजूनही खळले नाही' .यशोधरेच्या नयनकडातील/ नाही अजुनी अश्रू खळले 'ही प्रतिमा स्त्रीचे समाजातील गौण स्थान व स्त्रीच्या वाट्याला येणारे युगायुगाचे दुःख अत्यंत परिणामकारकपणे मांडते".जनी सांगू कशी मी बाळाची आई/ का इथे सरली सारी मम पुण्याई/ कैसे वदू हे फुल नोहे जाईचे/ हे माझे प्रेयस समत्वही हे माझे"[१५] या कुंतीच्या प्रतिमेतून पुरुषी वासनेचा बळी ठरललेल्या स्त्रीचे मातृत्व सनातन समाजव्यवस्थेने कसे नाकारले . पुरुषाला आपल्या वासना शमविण्याचा अधिकार संस्कृतीने दिला,परंतु स्त्रीला मातृत्वाचा हक्क देऊ शकली नाही .कुंतीच्या रूपाने ही युगायुगाची वेदना मुखरित झाली आहे .स्त्रीचे हे दुःख समाजात आजही कायम आहे . म्हणून" जिथे गुढ्यातोरणांनी दारे शृंगारली जातात/ जिथे दीपज्योतींनि घरे अलंकारिली जातात/ जिथे रंगीत उदयास्तात स्त्री परंपरेने शोषली जाते--- बंदिवान वृक्षांसारखी ती मनभर बंदिस्तच होते/ परप्रकाशित जीवनाची ती फक्त सावलीच उरते"[१६] अशा स्वरूपाच्या प्रतिमांतून स्त्रीशोषणाची युगानुयुगाची वेदना ठसठसताना दिसते . 'गुढ्यातोरणांनी दारे शृंगारली' ,'दीपज्योतींनि घरे अलंकारिली 'या प्रतिमा सांस्कृतिक उत्सवाच्या द्योतक आहे . संस्कृतीचा उदोउदो करणाऱ्या या व्यवस्थेचे एक प्रगत रूप एकीकडे आहे तर दुसरीकडे त्याहीपेक्षा कितीतरी हीन रूप 'स्त्री परंपरेने शोषली जाते' ,'परप्रकाशित जीवनाची ती फक्त सावलीच'या प्रतिमांतून प्रदर्शित होते .ह्या परस्परविरोधी प्रतिमा स्त्रीशोषणाचा विशाल पट वाचकांच्या इंद्रियापुढे उभा करतात .ज्योती लांजेवार यांच्या कवितेतील प्रतिमा स्त्रि वेदनेच्या प्रतिमा विशाल आशयाने भरलेल्या आहेत.

मलिका अमर शेख यांची कविता तर स्त्रीदुःखाच्या प्रतिमांचा वाहता पाट आहे .स्त्री शोषणाचे महाभयंकर जहरी वास्तव त्यांच्या कवितेतून ज्वालामुखीसारखे उद्रेकित झाले आहे" .रात्र पेटत जाते अंगाअंगातून/ असे अनेक बहकते वेडे श्वास/झील घेतलेले ज्वालामुख/ धुमसलेले वडवानल अदय / चंद्रावलेल्या किरणांनी विझत जातात"[१७]" , जळवांसारख्या डसतात नग्न रात्री जीवघेण्या/ दाहक विषारी सर्पांचे फुत्कार सर्व अंगाअंगाना .....नॅचरल प्रोसेस असणाऱ्या अटळ चार दिवसांतही/ नॅचरल प्रोसेस संभोग करावा".[१८]" आठवतात नवथर रात्री/ दाटून येतात अंगभरून जळजळीत सूर्य/ ग्रीष्माचं ऊन पेरीत रक्तफुलात/ स्तनावरल्यावर व्रणभरल्या वेदना ठसठतात/ धुमसतात ज्वालामुखीसारख्या/ उगवत्या सूर्यासारख्या लसलसत अग्निजिव्हा/ अशी कुंती असावी का? पाच प्रतिव्रता पंचकन्यांची नाव काय बरं"? [१९] पुरुषसत्ताक व्यवस्थेकडून स्त्री शोषणाच्या ,स्त्री भोगाच्या चिरवेदना उभ्या करणाऱ्या या प्रतिमा एकाच पातळीवर अनेक प्रकारच्या स्त्री शोषणाचा आशय चित्रित करतात .मालिका अमर शेख यांच्या कवितेतील 'मृत शहरे' ,'हिरोशिमा-नागासाकी' ',गिलोटिन', 'स्वातंत्र्याची पिचाकी तुतारी' ,'अभेद्य गुहा 'यांसारख्या प्रतिमांतून शोषण व्यवस्थेची शृंखलाच दर्शित झाली आहे .स्त्रीला

माणूस म्हणून समाजात सन्मान प्राप्त होत नसेल तर या देशाला गिलोटिन लावून नेस्तनाबूत)हिरोशिमा-नागासाकी ( केली पाहिजे हा विचार मांडणाऱ्या प्रतिमा पुरुषी मानसिकतेच्या अपरिहार्यतेतून प्रकट झाल्या आहेत.

'वाळूचा प्रियकर' या संग्रहातील कविता ही स्त्री दुःखाचा वेध घेणारी कविता आहे .यात वेश्या म्हणून पुरुषांकडून शोषल्या जाणाऱ्या स्त्रीचे दुःख प्रकट झाले आहे. या देशातील स्त्री युगानुयुगापासून दुःख सोबतीला घेऊन जीवनाचा प्रवास करीत आली आहे. संभोगातून शोषल्या जाणाऱ्या अस्तित्वहीन स्त्रीचे दुःख हे एकट्या स्त्रीचे दुःख नाही, तर ते देशातील स्त्री जातीचे दुःख आहे. जग बदलले परंतु पुरुषी मानसिकता बदलली नाही. प्राचीनकाळापासून सुरू असलेली स्त्री शोषणाची परंपरा आजही कायम आहे .या संदर्भात प्रज्ञा लोखंडे यांची कविता बोलकी आहे" .स्त्रीत्वाचा मूक आक्रोश सजवण्यात/ धन्य झालेली आपली महान संस्कृती/ जोहारापासून सतीपर्यंतचा हा प्रवास /एक्कीसवी सदीत तसूभरही बदलला नाही"[२०]" शतकानुशतकं या जमिनीवर कोरली/ स्त्रीत्वाची /नित्यनूतन नग्न दाहक सावली/ उद्याची".[२१] उषाकिरण आत्राम म्हणतात" ,सखे मला सांग/ आपण कुठवर असे लाजायचे गं/ चौकाचौकात, चोरवाटेवर शस्त्र उगारून मक्तेदार वाट पाहताहेत"[२२] 'स्त्रीत्वाचा मूक आक्रोश' ,'जोहारापासून सतीपर्यंतचा प्रवास' ,'नित्यनूतन नग्न दाहक सावली' ,'मक्तेदार वाट पाहताहेत' यांसारख्या अनेक प्रतिमांतून सामाजिक जीवनातील स्त्रीचे स्थान ,तिचा सामाजिक दर्जा, तिचे दुःख, दैन्य, दास्य तिचा दुबळेपणा अशा विविध स्तरांवरचा वेध या कवितेने घेतला आहे .वर्णव्यवस्थेने स्त्रीला अत्यंत खालच्या स्थानी ठेवले .भोगवस्तू एवढेच स्थान तिच्या वाट्याला आले .वेश्या,गणिका ,येल्लम्मा ,देवदासी ,जोगतीण या स्त्रीच्या प्रतिमा एक भोगदासी म्हणून मूल्य हरविलेली स्त्री प्रतिमा या कवितेतून साकार झाली आहे. स्त्रीचे रूप, शरीर, अंगे –उपांगे पुरुषी व्यवस्थेच्या भोगाचे साधन असल्यामुळे तिचे जीवन शोषणाच्या वेदनांनी घेरले आहे.या प्रतिमांतून गुलामीच्या काळोखात खितपत पडलेल्या स्त्री रूपाचे भेदक दर्शन घडते. सामाजिक सांस्कृतिक जीवनातील अंतर्विरोध असा आहे की माणसानेच माणसाला गुलाम करण्याची रीत प्रत्येक काळात पहावयास मिळते. धर्माने केलेल्या कायद्याने स्त्रीच्या गळ्यात कायमचा गुलामीचा फास अडकलेला आहे .तिला मुख्य प्रवाहात सामील करण्याऐवजी दुःखाच्या गटारात बुडवून ठेवले गेले .तिच्या शरीराचे लचके तोडले गेले.दलित जन्मत:च मरणयातना सोसणाऱ्या स्त्री प्रतिमांची जिवंत रूपे या कवितांतून प्रखरपणे साकार झालेली आहेत.

**नकार विद्रोह आणि प्रतिमा :-**

आंबेडकरी कवयित्रींनी विद्रोही मानसिकता घडविणाऱ्या घटकांची मांडणी कवितेमध्ये केली आहे. स्त्री आणि दलित या दोन्ही पातळ्यांवरील दुःख आणि शोषणाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्यातील विद्रोह जागृत झाला आहे. या विद्रोहाला फुले-आंबेडकरांच्या क्रांतीचे बळ मूलस्थानी आहे .म्हणूनच त्यांचा विद्रोह स्वातंत्र्याच्या प्रबळ ऊर्मीतून उदयाला येतो. दुःख आणि वेदना यांतून उदयाला आलेला हा विद्रोह विध्वंसासाठी नसून विधायक समाजनिर्मितीसाठी प्रकट झाला आहे .आंबेडकरी कवयित्रींनी अन्यायअत्याचाराच्या विरोधात संतप्त भूमिका घेऊन मन क्षुब्ध करणारे भाव प्रकट केले .म्हणूनच त्यांची कविता विद्रोही प्रतिमांचे अनोखे शब्दरूप धारण करताना दिसते. त्यांच्या कवितेतील नकार, विद्रोह आणि प्रतिमेचे स्वरूप स्वातंत्र्याच्या ऊर्मीतून प्रकट झालेले आहे' .सूर्यफुले' या कवितेत सुगंधा शेंडे म्हणतात' ,आता पेटली शेकोटी/ फेर धरा नि नाचा/ सूर्यही सामोरा

प्रकाश प्रकाश 'या ओळींतील 'पेटली शेकोटी' ही प्रतिमा आजवर मुकपणे अन्याय सहन करणाऱ्या दलित समूहात कैक शतकांपासून साचलेली अन्यायाविरुद्धची धग त्यांच्या हृदयात गुलामगिरीविरुद्ध क्रांतीचे स्फुल्लिंग निर्माण करणारी आहे. दलितांनी युद्धसज्ज होऊन सामूहिक लढा लढायचा आहे, हे 'फेर धरा आणि नाचा'या प्रतिमेतून दर्शित होते. इथे स्वातंत्र्याच्या ऊर्मीतून लढा लढल्या जाणार असल्यामुळे 'फेर धरा नि नाचा' हा क्रांतिउत्साह प्रकट झाला आहे. या क्रांतीला डॉ.आंबेडकरांच्या विचारतेजाचे बळ आहे आंबेडकरांच्या क्रांती तत्त्वज्ञानाने हा समूह जागृत झाला आहे. गुलामीच्या अंधकारातून बाहेर पडून तो आत्मभानाच्या तेजोमय प्रकाशात न्हाहून निघाला आहे' .संथ सागरात कसा वडवानल पेटला /विझविणारा जलसिंधू भस्म कसा जाहला ' सुगंधा शेंडे यांच्या या पंक्तीतून 'संथ सागर 'व ' वडवानल पेटणे' या परस्परविरोधी प्रतिमा तयार झाल्या आहेत . 'संथ सागर 'म्हणजे आतापर्यंत मूक असलेला सोशिक दलित समुदाय' .वडवानल' म्हणजे ज्वालामुखी. डॉ. आंबेडकर यांच्या प्रेरणेने आत्मभान लाभलेल्या निद्रिस्त समाजात आता ज्वालामुखी भडकला आहे . 'विझविणारा जलसिंधू 'म्हणजे विशाल प्रस्थापित समुदाय या वडवानलापुढे निष्प्रभ झाला आहे .हिरा बनसोडे यांच्या 'फिर्याद 'संग्रहातील 'सूर्योदय' कविता" -दोस्तहो तुमच्या डोळ्यांतील वाळवंट पुसून टाका/ तिथे पेरायला आणल्यात मी/ नवप्रेरणांच्या गर्भार बहरकळ्या /धुऊन टाका चेहऱ्यावरील भयग्रस्त अंधार/ प्रकाशाचे दिवे आणलेत मी तुमच्यासाठी/ तुमच्या ऐतिहासिक शापांना/ तुडविलेत मी वादग्रस्त पावलांनी/ आणि बंधमुक्त केलेत/ तुमचे कोंडलेले श्वास"[२३] आंबेडकरी कवितेतील हा विद्रोह गुलामगिरी आणि स्वातंत्र यांच्या द्वंद्वातून उफाळून येऊन तो स्वातंत्र्याच्या ऊर्मीत परावर्तित होतो' .तुमच्या डोळ्यांतील वाळवंट पुसून टाका' या प्रतिमेतून आत्मभान प्राप्त झालेल्या विद्रोही मनाचे मानस प्रकट झाले आहे. दलितांच्या उद्‌ध्वस्त जीवनात 'नवप्रेरणांच्या गर्भार बहरकळ्या' या प्रतिमेतून डॉ. आंबेडकरांच्या प्रेरणेने दलितांना आत्मभान लाभले .त्यांच्या वाळवंटमय भकास जीवनात नव्या प्रेरणावाटा त्यांना सापडल्या आहेत' .चेहऱ्यावरील भयग्रस्त अंधार' आणि 'प्रकाशाचे दिवे' या विरोधी प्रतिमांतून गुलामीतून मुक्ती असा द्वंद्वात्मक विचार प्रकट झाला आहे' .ऐतिहासिक शापांना' या प्रतिमेतून दलितांचे युगायुगाचे दुःख मुखरित झाले आहे' .बंधमुक्त केलेत तुमचे कोंडलेले श्वास' या प्रतिमेतून दडपशाहीच्या विरोधात विद्रोही मानसिकता कार्यरत होऊन सनातन संस्कृतीने लादलेल्या सर्व प्रकारच्या गुलामीतून दलित जीवनाला मुक्त केले, अशा स्वरूपाचा विद्रोह या ठिकाणी स्पष्ट झाला आहे' .अजून वादळ उठले नाही' या संग्रहातील ज्योती लांजेवार यांची कविता विद्रोही प्रतिमांनी काठोकाठ भरलेली आहे. त्यांच्या कवितेतील विद्रोह हा आव्हानात्मक आणि आवाहक आहे' .दिशा' ,'अजून वादळ उठले नाही' या संग्रहातील कवितांतून अगदी सुरुवातीपासून ते शेवटपर्यंत विद्रोहाचा आगडोंब उसळलेला दिसतो. कवयित्रीने जे सामाजिक जीवन जगले ,ते जीवन व्यक्तिगत आणि सामूहिक पातळीवर विविध प्रतिमांच्या माध्यमातून आविष्कृत केले. दलितांचे दुःख, अस्पृश्यता, स्त्री अत्याचार ,भुकेले जीवन , स्त्रियांची बेअब्रू इत्यादी वेदना विविध प्रतिमांतून प्रकट झाल्या आहेत.ज्योती लांजेवार म्हणतात" ,हे सनातन्यांच्या मनू/ मी तुझा पुन्हा करीन शिरच्छेद/ तुला उभा जाळून ह्या घमेंडखोर षंढांना/ पापपुण्याचा हिशेब लावणाऱ्या तुझ्या कर्मकांडाला"[२४] किंवा "कोणीच हिसकावू शकणार नाही/ भविष्याच्या ओठावरली गाणी/ मी अंधार जाळीत उगवणाऱ्या/ प्रलयंकारी सूर्याची निशाणी"[२५] 'हिरव्या गवतावर लाल घोषणा 'या कवितेतील प्रतिमांतून स्त्री अत्याचाराविरुद्धचा उद्रेक प्रकट झाला आहे . 'कौरवांच्या राज्यसभेत बेअब्रू होणारी पांचाली' ,'युगानुयुगे जन्माला आलेले दु:शासन' ,'दुष्टांच्या हातून

मावळणारा सूर्य','पुनरावृत्ती होऊ देऊ नकोस नव्या महाभारताची' ,'हिरव्या गवतावर लाल घोषणा' ,'पेटावे लागेल वणवा होऊन 'या प्रतिमा स्त्रीयांवरील अन्यायाविरोधात चढाईचे धोरण स्वीकारतात .

दलित कवयित्रींच्या कवितेतील नकार आणि विद्रोहाच्या प्रतिमा ताज्या दमाच्या आहेत .मुख्यत :धर्म, परंपरा, संस्कृती ,पुराणे इत्यादींना पुढे करून स्त्रीला गुलाम ठेवू पाहणाऱ्या प्रवृत्तीवर आघात करून अशा प्रवृत्तींना नाकारण्याचे कार्य यांतून घडले आहे .पुरुषी अहंतांनी पुरणकथांतील स्त्रीशोषणाला धार्मिकतेचे बेगड लावून स्त्रियांवर अत्याचार करणाऱ्या दुष्टांना वंदनीय मानणारी हीन मनोवृत्ती समाजात निर्माण केली .अशा अक्षम्य मनोवृत्तीविरुद्ध निषेध नोंदविणे स्वाभाविक आहे .या हीन मनोवृत्ती नाकारून स्त्रियांना प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी हा विद्रोह जळजळीत प्रतिमांतून व्यक्त झाला आहे .क्रियाशील कलावंताच अशा स्वरूपाच्या विद्रोही प्रतिमांचे उपयोजन करू शकतो .संवेदनेला वेगळे वळण लावून क्रांतिकारी पावित्र्याची आखणी करणाऱ्या या प्रतिमा विलक्षण आहेत. यातून क्रांतिकारी भावनांचे उग्रदाहक रूप स्पष्ट होते .हा उग्रदाहकी विद्रोह स्त्री स्वातंत्र्य आणि स्त्री प्रतिष्ठेच्या भूमिकेतून जन्माला आला आहे .या विद्रोही ,विस्फोटक ,आव्हानात्मक प्रतिमा हेच आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेचे समकालीन संदर्भातील पृथगात्म प्रकृतिविशेष आहे.

**पौराणिक मिथके आणि प्रतिमा :-**

आंबेडकरवादी कवयित्रींनी आपल्या कवितेतून पौराणिक मिथकांचा समर्पक वापर केलेला दिसतो. रामायण, महाभारतादी महाकाव्यातील जातीयतेचा व स्त्रीशोषणाचा बळी ठरलेली गौण पात्रे या कवयित्रींच्या काव्यात नायकाच्या रूपात आलेली दिसतात. प्राक्कथासंदर्भात केलेल्या सखोल चिंतनाला त्यांनी समर्थ प्रतिमांची जोड दिली आहे. व्यवस्थेच्या जात्यात भरडल्या गेलेली पराभूत प्रतिमारूपे परिणामकारक व परिवर्तनकारक आहेत. पाश्चात्त्य कथांमधूनही काही प्रतिमारूपे घेतलेली आहेत .भारतीय पुराणकथांतील शंबूक, एकलव्य, कर्ण, द्रौपदी,अहिल्या या मिथकांचा कवयित्रींनी समर्पक वापर केला आहे. ज्या संस्कृतीने येथील शूद्रांचे आणि स्त्रियांचे माणूसपण नाकारले, त्यांच्यावर अनन्वित अत्याचार केले, अशा संस्कृतीचे विच्छेदन करण्यासाठी सदर प्रतिमांचा वापर करण्यात आलेला दिसतो. रामराज्यात जातिव्यवस्थेचा बळी गेलेल्या शंभूकाला उद्देशून प्रज्ञा लोखंडे लिहितात,

"शंबूका/ मी वाट पाहते इतिहासाच्या पानावर/ तू पेरून ठेवलेल्या सुरुंगाच्या/ दाहक स्फोटाची"[२६] हिरा बनसोडे म्हणतात" ,कुडाच्या मोडक्या झोपडीत/ उपहासाने गरिबी विव्हळत / कुणीही कर्ण अन्नदान करीत नाही"[२७], "यशोधरे तू एक जन्मव्याकूळ दुख:स्वप्न/ तुझ्याकडे पाहण्याचे/ निर्लज्ज धाडस होत नाही/ बुद्धाच्या प्रकाशाने आम्ही उजळलो. पण-- तू /तू मात्र अंधार पचवलास जीवन काळं निळं होईस्तोवर/छिन्न जगून बेचिराख झालीस / यशोधरे"!---[२८]" जिथे पातिव्रत्यासाठी सीतेला अग्निदिव्य करावे लागले/ इंद्राच्या पाशवी वासनेसाठी अहिल्येला बळी जावे लागले/ पंचपुरुषत्वासाठी द्रोपदीचे विभाजन करावे लागले/ त्या देशाची स्त्री अजून गुलाम आहे"[२९]'सखी, आज प्रथमच तू माझ्याकडे जेवायला आलीस/ शबरीच्या भोळ्या भक्तीनेच ताट तुझे मी सजविले''युगायुगाची कुंती होऊन कर्णरूपात तू आमचे मातृत्व नाकारत आलीस 'असा सवाल इथल्या संस्कृतीला हिरा बनसोडे यांनी केला .तर ज्योती लांजेवार म्हणतात' ,तू दिलेले प्रज्ञाचक्षू गांधारी होत आहेत '.

अशा प्रकारे दलित कवितेतून यशोधरा,सीता अहिल्या कुंती,द्रौपदी इत्यादी पौराणिक प्रतिमांतून स्त्रीदु:खाची प्रखर वेदना प्रत्ययकारीपणे आविष्कृत झाली आहे.

या कवयित्रींनी अनेक कवितांतून शंबूक,कर्ण,एकलव्य या प्रतिमांचे प्रभावी उपयोजन केले .सनातन हिंदू संस्कृतीचे हीन रूप समाजापुढे मांडून मानवाला विचारप्रवृत्त केले .कवयित्री ज्योती लांजेवार म्हणतात" ,अरे... तू शंभूकही चितारलास/ डोळ्यांत तुझ्या; एकलव्याचेही ठेवलेस भान/ उगवत्या सूर्याला साक्षी ठेवून/ तू झालास सूर्य आमचा"[३०]

आंबेडकरी कवितेत शंबूक, एकलव्य, कर्ण, अश्वत्थामा, सीता, अहिल्या, द्रौपदी, कुंती, गांधारी, यशोधरा, शबरी या मिथकांचा वापर विशेषत्वाने आढळतो. शंबुकाने ज्ञानसाधना केली म्हणून रामाने त्याचा शिरच्छेद केला. द्रोणाचार्याने एकलव्याचा अंगठा कापला. सीता पुरुषीव्यवस्थेचा बळी गेली .कुंतीचे मातृत्व नाकारले गेले. गांधारीला दृष्टी असूनसुद्धा पती आंधळे असल्यामुळे तिला आयुष्यभर अंध जीवन जगावे लागले. या कृती स्त्रियांवरील अन्यायाच्या द्योतक आहेत .स्त्रियांवरील अन्यायाची परंपरा अजूनही थांबली नाही ,या देशात स्त्री अजूनही गुलाम आहे ,हा विचार परिणामकारकपणे व्यक्त झाला आहे .शंबूक, एकलव्य, कर्ण, अश्वत्थामा, सीता, अहिल्या, द्रौपदी, कुंती, गांधारी, शबरी एकलव्य आणि शबरी यांच्यावर झालेल्या अत्याचाराचे सत्य दडपण्यासाठी त्यांच्याभोवती रंजक कथांचे वेष्टण उभारून त्यांचे उदात्तीकरण करण्यात आले .परंतु आंबेडकरी कवितेने वस्तुनिष्ठपणे हे सत्य वाचकांपुढे उजागर केले .या कवयित्रींनी मिथकांचा समर्पक वापर करून 'दलित' आणि 'स्त्री' या दोन्ही समाजघटकांवर झालेला अन्याय शब्दबद्ध करून समकालीन संदर्भात मिथकांना नवा अर्थ प्राप्त करून दिला आहे.

**डॉ .आंबेडकर आणि 'सूर्य' प्रतिमा :-**

आंबेडकरी कविता ही सूर्यकुलातील कविता आहे. दलित कवयित्रींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासाठी वारंवार ' सूर्य' प्रतिमा वापरली आहे. शतकांच्या प्रवासानंतर अंधारात खितपत पडलेल्या या समूहाला डॉ. आंबेडकरांनी उजेडाची दिशा दाखविली. त्यामुळे उजेडदात्याच्या भूमिकेत 'डॉ .आंबेडकर 'ही प्रतिमा साकार होते .जातीयतेने बरबटलेल्या तमोयुगात डॉ .आंबेडकरांचा उदय म्हणजे दलितांच्या जीवनात जणूकाही सूर्याचाच उदय आहे .दलित शोषितांच्या अंधकारमय जीवनात उजेड पेरणारा हा सूर्य खऱ्या अर्थाने दलितांचा मुक्तिदाता आहे. या अर्थाने सूर्य ही प्रतिमा वापरलेली आहे .सूर्य ही प्रतिमा मुळात अंधाराला नष्ट करणारी, अन्यायाला वाचा फोडणारी ,मृतप्राय जीवनात प्राण ओतणारी ,गुलामिविरोधात क्रांतीचे बंड पुकारणारी,दु:खी- अज्ञानी जीवनात सुख-ज्ञान पेरणारी प्रतिमा आहे .डॉ .आंबेडकर नावाचा सूर्य जन्माला आल्यानंतर दलित शोषित समाजाचे जगण्याचे अर्थ बदलून गेले .या समूहाला डॉ .आंबेडकर सूर्यापेक्षाही महान वाटू लागले . सुगंधा शेंडे म्हणतात' ,आता पेटली शेकोटी/ फेर धरा नि नाचा/ सूर्यही समोरा प्रकाश प्रकाश.' हिरा बनसोडे म्हणतात' ,बाबा तुम्ही कसे दारिद्र्याच्या अंधारातही तळपणारे सूर्य जसे' ,'अपरंपार वेदनेतून उफाळलेली मी विद्रोहाची जननी/ भीमरायाच्या सामर्थ्यवान हातातली मी आहे तेजस्वी लेखणी .'ज्योती लांजेवार म्हणतात , 'रंगात आसवांच्या भिजते जिथे विराणी/तुझ्याशिवाय भीमा गाऊ कुठली गाणी','उगवत्या सूर्याला साक्षी ठेऊन / तू झालास सूर्य आमचा' ,'काळोख गर्भ दिशाहीन प्रवासातला तू देदीप्यमान तारा 'अशा प्रकारे डॉ .आंबेडकर

यांच्याविषयी अशा असंख्य प्रतिमा योजिल्या आहेत .या प्रतिमांतून बाबासाहेबांबद्दलचा आदरभाव व्यक्त झाला आहे,त्यांच्याविषयी कृतज्ञभाव प्रकट झाला आहे.दलितांच्या जीवनात डॉ .आंबेडकर महानायकाच्या रूपात आले आहेत.ते त्यांचे खरे मुक्तिदाते आहेत.त्यांच्यासाठी ते सूर्य झाले ,महासूर्य झाले आहेत .

**उपसंहार :-**

लेखक किंवा कलावंत ज्या परिवेशात जन्माला येतो, त्या परिवेशातील अनुभूतीचे सूर त्याच्या कलाकृतीत उतरत असतात .त्याने जगलेले ,भोगलेले अनुभव त्याच्या मनःपटलावर धिंगाणा घालत राहतात . कलावंताचे हे जीवनानुभव संचित झालेल्या शब्दरूपी प्रतिमांची जग असते .दलित-आंबेडकरी कवयित्रींची कवितेतील प्रतिमा आत्मभान, आत्मशोध, नकार, विद्रोह, निषेध, वेदना,बांधिलकी या जाणिवांच्या विविध पातळ्यांवर समृद्ध झालेल्या आहेत .या कवितेतील प्रतिमांतून स्त्रीत्वाचे आणि दलितत्वाचे रौद्रभीषण जीवनदर्शन घडते .या कवितेत अनेक प्रतिमा ,प्रतीके आणि संकेतांचा विस्तार आहे .प्रतिमांचा हा विस्तार अनुभूतीच्या अपरिहार्यतेतून झाला आहे .या कवयित्रींना एकाच वेळी स्त्री आणि दलित या दोन्ही पातळ्यांवरील व्यामिश्र अनुभूती साकार करताना त्यांना अनेक गुंतागुंतीच्या प्रतिमांचा आधार घ्यावा लागला .या प्रतिमा जाणिवांशी निगडित आहेत. इंद्रियगोचर अनुभूतीची परिणामकारक शब्दचित्रे या प्रतिमांतून यथार्थपणे रेखित केली आहेत . कवयित्रींना सांगायचा असेलेल्या अर्थाचे अभिसरण या प्रतिमांतून तीव्रतेने झालेले आहे .या कवयित्रींनी वैविध्यपूर्ण अनुभवांच्या प्रकटीकरणासाठी अनुभवांची दृश्य सामग्री जमवून तशा आशयाच्या प्रतिमा धारण करीत समग्र जीवनदर्शन साकार करण्याचा यशस्वी प्रयत्न केला .समाजव्यवस्थेतील दोषांबरोबर त्यांनी मूल्यभावांचेही प्रक्षेपण घडविण्यात या प्रतिमा सहाय्यभूत ठरल्या.परंपरावाद्यांचे साहित्य अनेक व्याधींनी ग्रस्त आहे .समाजातील सूक्ष्मातिसूक्ष्म पातळीवरील अनुभवांचे याथादर्शन घडविण्यात ते अपयशी ठरले . प्रस्थापितविरोधी कलावंताच्या भूमिकेचा डाग त्यांनी स्वतःच्या प्रतिभेला लागू दिला नाही .परंतु दलित - आंबेडकरी कवयित्रींनी संस्कृतिशरण अथवा प्रवाहपतित न होता पुराणकाळापासून वर्तमानकाळापर्यंत सर्व घटनांची सटीक कारणमीमांसा करून जीवनातील उन्नत मार्गाचे प्रत्ययकारी दर्शन घडविणाऱ्या प्रतिमा निर्माण केल्या .त्यामुळे या प्रतीमासृष्टीने मराठी कवितेला मूल्याधिष्ठित नवे आयाम प्राप्त करून दिले .ही कविता नव्या साहित्यकृतीला दिशादर्शक ठरेल ,असा विश्वास आहे.

**संदर्भ सूची :-**

१ .वसंत आबाजी डहाके ,कवितेविषयी, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ,.१९९९ ,पृष्ठ ९३.
२ .सुधीर रसाळ ,कविता आणि प्रतिमा, मौज प्रकाशनगृह, मुंबई, प्र.आ,.१९८२ ,पृष्ठ २३२.
३ .महेंद्र भवरे ,दलित कविता आणि प्रतिमा, लोकवाङ्मयगृह प्रकाशन, मुंबई, प्र.आ,.२०१२, पृष्ठ ३९,४० .
४ .सुगंधा शेंडे ,अग्निशिखा ,शीलन प्रकाशन नागपूर)आवृत्तीचा उल्लेख नाही,( १९८९, पृष्ठ ३६.
५ .ज्योती लांजेवार, दिशा, निखिल प्रकाशन, नागपूर, प्र.आ,.१९८२, पृष्ठ ४.
६ .हिरा बनसोडे ,पौर्णिमा, श्रीशेष प्रकाशन, भंडारा ,प्र.आ,.१९७०, पृष्ठ १८.
७ .तत्रैव ,पृष्ठ १८.
८ .प्रज्ञा लोखंडे ,उत्कट जीवघेण्या धगीवर ,लोकवाङ्मयगृह प्रकाशन, मुंबई, प्र.आ ,.२००२, पृष्ठ १.

९ .हिरा बनसोडे ,फिर्याद, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, दु. आ,.१९९७, पृष्ठ ४१.
१० .सुगंधा शेंडे ,उनि ,.पृष्ठ
११ .ज्योती लांजेवार, अजून वादळ उठले नाही, क्रांतिपर्व प्रकाशन ,पुणे, प्र.आ ,.२००० ,पृष्ठ १०.
१२ .हिरा बनसोडे ,पौर्णिमा, श्रीशेष प्रकाशन, भंडारा ,प्र.आ,.१९७०, पृष्ठ ३६.
१३ .तत्रैव ,पृष्ठ ७१.
१४ .तत्रैव ,पृष्ठ २८.
१५ .हिरा बनसोडे ,फिर्याद ,उनि,. दु. आ,.१९९७, पृष्ठ ३६.
१६ .मलिका अमर शेख ,वाळूचा प्रियकर, ज्योती अमर शेख, शाहीर अमर शेख रोड, मुंबई ११, प्र.आ,.१९७९, पृष्ठ ९ .
१७ .तत्रैव ,पृष्ठ १०,११.
१८ .तत्रैव ,पृष्ठ १२.
१९ .प्रज्ञा लोखंडे ,अंत:स्थ, डिंपल पब्लिकेशन. ठाणे. द्वि.आ.२००४, पृष्ठ ३५.
२० .प्रज्ञा लोखंडे ,उत्कट जीवघेण्या धगीवर,उनि,. पृष्ठ ४५ .
२१.उषाकिरण आत्राम ,म्होरकी, गोंडवाना गोंडी साहित्य परिषद, नागपूर ,प्र.आ ,.१९९७ ,पृष्ठ ३४.
२२ .हिरा बनसोडे ,फिर्याद ,उनि,. पृष्ठ २८.
२३ .ज्योती लांजेवार ,अजून वादळ उठले नाही, क्रांतिपर्व प्रकाशन, पुणे ,प्र.आ.२०००, पृष्ठ २३.
२४ .तत्रैव ,पृष्ठ ४९.
२५ .प्रज्ञा लोखंडे ,अंत:स्थ ,उनि,. पृष्ठ ५६.
२६ .हिरा बनसोडे ,फिर्याद ,उनि,. पृष्ठ २४.
२७ .तत्रैव ,पृष्ठ ३६.
२८ .तत्रैव ,पृष्ठ ३६.
२९ .तत्रैव ,पृष्ठ.
३०.ज्योती लांजेवार ,दिशा, निखिल प्रकाशन, नागपूर,प्र.आ,.१९८२, पृष्ठ २.